# उभयान्वयी अव्यये

दोन शब्दांनी किंवा दोन पेक्षा जास्त दोन वाक्यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दाला उभयान्वयी अव्यय म्हणतात.

उदा ① आईने बाजारातून कांदे व बटाटे आणले

② मधुने छान भाषण केले म्हणून त्याला बक्षीस मिळाले
(दोन वाक्यांना जोडले)

③ मी शाळेच्या प्रांगणात पाऊस पडले (आणि पाऊस सुरू झाला (दोन वाक्यांना जोडले)

उभयान्वयी अव्यय

| प्रधानत्वसूचक (4) उभयान्वयी अव्यय | गौणत्वसूचक (4) उभयान्वयी अव्यय |
|---|---|
| 1) समुच्चयबोधक | 1) स्वरूपबोधक |
| 2) विकल्पबोधक | 2) कारणबोधक |
| 3) न्यूनत्वबोधक | 3) उद्देशबोधक |
| 4) परिणामबोधक | 4) संकेतबोधक |

→ रचना प्रधान वाक्य + प्रधान वाक्य
(संयुक्त वाक्य)

* प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यय
अर्थाच्या दृष्टीने दोन स्वतंत्र वाक्य (प्रधान / समान दर्जाची वाक्य) जोडणाऱ्या शब्दाला प्रधानत्वसूचक उ अ म्हणतात

1) वाटेत सायकल खराब झाली म्हणून मला यायला उशीर झाला

1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये
जी अव्यये पहिल्या विधानात भर घालणारे दुसरे विधान जोडतात त्यांना समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये असे म्हणतात
(व, आणि, आणखी, आणिक, न अन नि, शिवाय
1) वारा सुटला आणि पावसाला सुरुवात झाली
2) भिकाऱ्याला मी जेवू घातले शिवाय एक सदरा दिला
3) पिलाने घरट्याबाहेर मान काढली व किलबिलाट
4) आता सध्याकाळ होत आली होती आणि किंवा आईला घराकडे येण्याची ओढ लागली

2) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये
दोन किंवा अनेक गोष्टींपैकी एकाची निवड दर्शविताना ती वाक्ये ज्या अव्ययांनी जोडतात त्यांना विकल्पबोधक उ अ म्हणतात.

(वा, अथवा, की, किंवा)

1) देह जावो अथवा राहो
2) तुला ज्ञान हवे की धन हवे
3) पाऊस पडो अथवा न पडो आम्ही
सहल जाणारच
4) तु हं म्हण अगर नाही म्हण

3) न्युनत्वबोधक उभयान्वयी अव्यये (विरोधदर्शक)

पहिल्या वाक्यातील उणीव दुसऱ्या वाक्याने दर्शविणाऱ्या अव्ययांना न्यूनबोधक उ. अ म्हणतात ही अव्यये दोन वाक्यात विरोध दर्शवितात म्हणून त्यांना विरोधदर्शक उ अ म्हणतात.

(पण, परंतु, किंतू, परी, बाकी)

1) शेतकऱ्यांनी शेते नांगरली पण पाऊस पडलाच नाही.
2) मरावे परी कीर्तीरूपी उरावे
3) पुष्कळ मुले उत्तीर्ण झाली परंतू विशेषप्राविण्यात कोणही आले नाही.

4) सर्वांना माहित आहे पण लक्षात कोण घेत

कारक — प्रधान + गौण
उद्देश — गौण + प्रधान
संकेत — शर्त + प्रधान
} - मिश्र वाक्य

संयुक्त

4) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

पहिल्या वाक्यातील घटनेचा परिणाम दुसऱ्या वाक्यात सूचवणाऱ्या अव्ययांना परिणामबोधक उभयान्वयी अव्यय म्हणतात

म्हणून, सबब, याकरिता यास्तव तेव्हा तस्मात तेव्हा की

1) मधुने उत्तम भाषण केले म्हणून त्याला बक्षीस मिळाले
2) वाटेत माझी स्कुटी बिघडली सबब मला कॉलेजला येण्यास उशीर झाला
3) तुम्ही त्याचा उपमान केला याकरीता तो तुमच्याकडे येत नाही
4) पैसा आला की

स्कुटी

## गौणत्वसूचक उभयान्वयी

अर्थाच्या दृष्टीने दोन असमान दर्जाची म्हणजे प्रधान वाक्य व गौण वाक्य यांना जोडणाऱ्या शब्दांना गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये म्हणतात

उपप्रकार 1) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय

# गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये

1) **स्वरूपबोधक**

पहिल्या प्रधान वाक्याचे स्वरूप दुसऱ्या गौणवाक्याने कळते तेव्हा त्या वाक्यात जे शब्द वापरतात त्याना स्वरूपबोधक उ अव्यय म्हणतात

म्हणून, म्हणजे, की, जे

1) 1 लक्ष रूपये म्हणजे 100 हजार रूपये होय
2) दशरत म्हणून 1 राजा होवून गेला
3) तो म्हणाला की ती आली नाही
4) विनंती अर्ज ऐपैसा जे पाण्याची सोय करावी

2) **कारणबोधक**

पहिल्या प्रधान वाक्यातील घटनेचे कारण दर्शविणारे दुसरे गौण वाक्या जोडणाऱ्या अव्ययांना कारणबोधक उ. अ. म्हणतात.

कारण, कारण की, का की

उदा :- ① त्याला शिक्षा झाली कारणकी तो चोरी केली
② त्याला बढती मिळाली कारण त्याने चोक कामगी बजावली
③ आम्हाला हेच कापड हवे का की हे आमच्या देशातील स्वदेशी आहे

④ तो इतका खेळला कि त्याचे अंग दुखू लागले
⑤ तो म्हणाला की (स्वरूपबोधक) (परिणामवाचक)
⑥ पास झालो की पेढे वाटेन (संकेत)

3) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये

दुसऱ्या प्रधान वाक्याच्या कृतीचा उद्देश पहिल्या गौण वाक्यातून देताना उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये वापरतात (म्हणून, सबब, यास्तव, कारण की इ.)

1) चांगला औषधोपचार लाभाव म्हणून तो मुंबईस गेला
2) नोकरी मिळवी म्हणून तो लातूरला गेला
3) विजेतेपद मिळावे यास्तव त्याने खूप प्रयत्न केला
4) आमचे शरीर सदृढ व्हावे म्हणून आम्ही व्यायाम करतो